**सहयोगी प्राध्यापक, मूत्रशल्यचिकित्साशास्त्र या संवर्गाची दि.०१.०१.२०२० रोजीची अंतिम जेष्ठतासूची**

संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन
क्रमांक 513
दिनांक 10/2/2021
मुंबई-४०० ००१.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
शासन परिपत्रक क्र.ज्येसूची-२०२०/ प्र.क्र.४८ /वैसेवा-२
गो.ते. रुग्णालय, नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- ३१.१२.२०२०.

वाचा:- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही- २०११/ प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११

२. शासन परिपत्रक क्र.ज्येसूची – २०१९/प्र.क्र.१३/वैसेवा-२,दि.११.०२.२०२०

३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व सेशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.एमएमईआरएस/अंतिम ज्ये.सू./सहयोगी प्राध्यापक/ मूत्रशल्यचिकित्साशास्त्र /४/क, ६१, दिनांक-१०.०१.२०२०

**शासन परिपत्रक**

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक, मूत्रशल्यचिकित्साशास्त्र या संवर्गातील नियमित नियुक्ती पदधारकांची दि. ०१.०१.२०१९ रोजीची अंतिम जेष्ठतासूची संदर्भाधिन क्रमांक २ येथील पत्रकान्वये प्रसिध्द करण्याकरण्यात आली आहे. आता संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये संचालक यांनी दिनांक दिनांक ०१.०१.२०२० रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

२. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक, मूत्रशल्यचिकित्साशास्त्र (गट-अ) या संवर्गातील दिनांक ०१.०१.२०१९ ते दि. ३१.१२.२०१९ या कालावधीत कार्यरत असलेल्या राजपत्रित पदधारकांची दिनांक ०१.०१.२०२० रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची या परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणापत्रान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सदर जेष्ठतासूची सामान्य प्रशासन विभागाने विहीत केलेल्या दिनांक २१.१०.२०११ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार व त्यात दर्शविलेल्या नमुन्यात तयार करण्यात आलेली आहे. तसेच ही जेष्ठतासूची मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण तसेच कोणत्याही संबंधित न्यायालयाच्या होणा-या आदेशाच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी या शासन परिपत्रकाची प्रत सोबतच्या विवरणपत्राच्या प्रतींसह संबंधित पदधारकास हे परिपत्रक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत द्यावी व त्यांच्याकडून पोच घ्यावी. जे अधिकरी रजेवर अथवा अन्य कारणास्तव गैरहजर असतील त्यांनी देखील सदरहू शासन परिपत्रक सहपत्रासह प्राप्त होईल याची संचालक यांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संतोष ज्ञा. देशमुख)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र** : जेष्ठतासूची विवरणपत्र

**प्रति,**

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये / संबंधित सर्व सहयोगी प्राध्यापक (संचालकांमार्फत)
३. अ.स. (वैसेवा-१), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. निवड नस्ती / वैसेवा-२.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक, मुत्रशल्यचिकित्साशास्त्र (Urology) या संवर्गात नियमित पदधारकांची दि.०१.०१.२०२० रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिका-याचे नांव | प्रवर्ग | जन्म दिनांक | नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठता मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | १ | डॉ.सिध्दीकी अयुब मोहम्मद | खुला | २०.०५.१९७१ | मलोआ १५.०९.२००९ | सरळसेवा | १५.०९.२००९ | ३१.०५.२०३५ | एम.एस. एम.सीएच (युरोलॉजी) | -- |
| २ | २ | डॉ.व्यंकट अर्जुनराव गिते (भज-ड) | खुला | ०१.०१.१९७४ | पदोन्नती- १७.११.२०१८ | पदोन्नती | १७.११.२०१८ | ३१.१२.२०३८ | एम.एस. डिएनबी (मूत्रशल्य) | शासन आदेश दि.१७.११.१८ अन्वये आस्था.मंडळ मार्फत खुल्या प्रवर्गातून पदोन्नती |